## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. २२ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागातर्फे आंतर महाविद्यालय नियतकालिक अंक स्पर्धा होणार असून महाविद्यालयांनी दि. ३१ डिसेंबरपुर्वी नियतकालिकांचे अंक जमा करावे असे आवाहन विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. जयेंद्र लेकुरवाळे यांनी केले आहे.

महाविद्यालयात शिकणा-या विद्यार्थ्यांच्या साहित्य विषयक कलागुणांना वाव मिळावा यातुन भविष्यात प्रतिभासंपन्न लेखक, कवी, विचारवंत निर्माण व्हावेत या उद्देशाने आंतर महाविद्यालय नियतकालिक अंक स्पर्धा सुरू करण्यात आलेली आहे. सन २०२२-२३ मध्ये प्रकाशित झालेल्या नियतकालिक अंकाच्या पाच प्रती महाविद्यालयांनी ३१ डिसेंबर पर्यंत विद्यार्थी विकास कार्यालयात जमा करणे आवश्यक आहे. उत्कृष्ट मुखपृष्ठ, उत्कृष्ट अंकमांडणी तसेच कथा, कविता, लेख व संशोधन लेख यांना प्रथम, व्दितीय व तृतीय पारितोषिक तसेच उत्तेजनार्थ प्रमाणपत्र दिले जाईल. अशी माहिती संचालक डॉ. जयेंद्र लेकुरवाळे यांनी दिली आहे.

**बातमी क्रमांक २**

जळगाव दि. २२ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विचारधारा प्रशाळा अंतर्गत महात्मा फुले अध्ययन व संशोधन केद्राच्यावतीने महात्मा फुले यांच्या स्मृतीदिनी म्हणजे दि. २८ नोव्हेंबर रोजी डॉ. गणपत भिसे यांचे व्याख्यान होणार आहे.

मंगळवार दि. २८ नोव्हेंबर रोजी दुपारी २ वाजता डॉ. भिसे हे "सत्यशोधक महात्मा फुले" या विषयावर बोलणार असल्याची माहिती या केंद्राचे विभागप्रमुख प्रा. पवित्रा पाटील यांनी दिली.

.................................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२३ दिनांक: २२ नोव्हेंबर, २०२३

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी